PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Nishpaap
Year: 1993

Song: Evdhe Maj Sang Na
Lyricist: Sudhir Moghe

एवढे मज सांग ना
एवढे मज सांग ना
प्रेम केले मी तुझ्यावर
हाच का माझा गुन्हा
एवढे मज सांग ना
एवढे मज सांग ना

सांग आपण भेटलो का
सांग आपण गुंतलो का
सांग आपण भेटलो का
सांग आपण गुंतलो का
काय नाते जोडले हे
तोडण्यासाठी पुन्हा
एवढे मज सांग ना
एवढे मज सांग ना

एक आशेचा मनोरा
आणि स्वप्नांचा फुलोरा
एक आशेचा मनोरा
आणि स्वप्नांचा फुलोरा
उधळला का खेळ सारा
फक्त उरली वंचना

प्रेम केले मी तुझ्यावर
हाच का माझा गुन्हा
एवढे मज सांग ना

प्रेम दाहक
प्रेम दाहक आणि जहरी
उमलते सलते जिव्हारी
प्रेम दाहक आणि जहरी
उमलते सलते जिव्हारी
हे दुधारी शस्त्र देते
एक जळती वेदना
एवढे मज सांग ना
एवढे मज सांग ना
प्रेम केले मी तुझ्यावर
हाच का माझा गुन्हा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*